
# कारी रणभूमी

अलेक्झांडरवर स्कॉटलंड यार्डला नव्यानं संशोधन करावं असं का वाटलं ? ती तर एक अत्याधुनिक विज्ञानावर भरवसा ठेवणारी संस्था आहे. त्यांना साधने, सत्ता, संपत्ती व तज्ज्ञ यांची कमतरता नाही. मुळात एखादे संशोधन नव्याने का घेतले जाते?

2000 साली अलेक्झांडरच्या इजिप्तमधला अलेक्झॉड्रिया शहरातल्या थडग्याचा शोध लागल्यावर ते उघडले गेले व आतापर्यंत अज्ञात राहिलेली अनेक रहस्ये ऊजेडात आली.




कारी ही रणभूमी जनरल ॲबटने 1848 मध्ये शोधून काढली. स्वतः सेनाधिकारी असलेल्या ॲबटची जिज्ञासा चाळवली त्यानं दोन दिवस फिरून स्वतः त्या रणभूमीचे नकाशे तयार केले. जुन्या ग्रीक नकाशांशी तोडून पाहिले व त्याची खात्रीच झाली. आक्रमकाला इथे लढून विजय मिळणे शक्य नाही.

कारी या रणभूमीवर पुरूने अलेक्झांडरचा सपशेल धुव्वा उडवला याचे इस्त्रोच्या इमेजवरून चित्रांकन केले तर कालौघात दडलेल्या अनेक प्राचीन घटना प्रकाशात येतील. इस्त्रोने असे चित्रांकन करून त्याचे संशोधन स्वतः करावे वा स्कॉयलंड यार्डशी सहकार्य करून इथल्या विज्ञान संस्था विद्यापीठे यांचे सहाय्य घेऊन करावे.

अलेक्झांडर व पुरूचे युध्द ग्रीक इतिहासकारांना वाटते तसे झाले नाही. ग्रीक नकाशा व त्या ठिकाणी 1848 मध्ये जनरल ॲबट ने आपल्या युध्दविषयक ज्ञानाचा उपयोग करून काढलेला नकाशा यात फरक आढळला आहे. आता इमेजरी चित्रांकनावरून कारी या रणभूमीचे विश्लेषण झाले तर त्रिमिती संकलन करताना अलेक्झांडरचा पराभव का व कसा झाला याचे वैज्ञानिक चित्र मिळवता येईल.

जितक्या उंचावरून आपण प्रदेश पाहतो तितका तो सुस्पष्ट होत जातो. साध्या टेकडीवर चढून जे दिसेल त्याहून अधिक विमानातून व त्याहून अधिक आठशे किलोमीटर इमेजरी चित्रांकनातून कळले. कारी रणभूमीचा प्रदेश पाकिस्तानच्या हद्दीत मोडत असल्याने इस्त्रोला या प्रदेशाचे चित्रण करण्यासाठी पाकिस्तानची परवानगी मिळवावी लागेल.

फार दूर गेलेल प्राचीन रस्ते, नद्यांची वळणे, डोंगर प्रदेश, दऱ्या व शिखरे यांचे सुसंवादी चित्रण (टोपोग्राफीक) डोळ्यासंमोर उभे राहिले की अनेक न सुटलेल्या कोडयांचे उत्तर मिळते.

कारी रणभूमीवर अलेक्झांडरचा पराभव झाला असेल तर भूगोल आपल्याला ते दाखवील. ॲबटला स्वतःच्या नकाशा परिक्षणात दोन ठळक वैशिष्टे कळली.

1. कारी रण मैदान गारगोटीच्या दगडाचे बनले आहे. ते साध्या मैदानापेक्षा टणक आहे.
2. कारी नावाच्या टेकडीने (टेकडयांनी) त्या मैदानाला उत्तर दक्षिण विळखा घातला आहे.

ग्रीकांना वर्णिलेला चिरखल, पाऊस, वारे, दलदल या प्रदेशाला लागू होत नाही. हे पठार एका बाजूने टेकडी व दुसऱ्या बाजूने झेलम नदीला येऊन भिडले आहे. त्यामुळे अलेक्झांडरच्या घोडदळाला पुरूच्या सैन्याची डावी–उजवी बाजू गाठता येणे कठीण आहे. ग्रीक नकाशा व ॲबटने तयार केलेला दुसरा नकाशा हे सांगतो, की सतरा मैल मध्यरात्रीची कष्टदायी वाटचाल करणारे सैन्य ज्या भूना खेडयापाशी (सध्याचे हरणपूर) बेट ओलांडू शकले ते युध्दभूमीच्या ऐन मध्यावर उतरले. असे होण्याचे शास्त्रीय कारण म्हणजे त्या ठिकाणी बेट असल्याची कल्पना युध्दभूमीवर उतरलेल्या अलेक्झांडर व अधिकाऱ्यांना

नव्हती. (एरियन) अलेक्झांडरचे प्रदेशाचे अज्ञान त्यामुळे उघडे पडले आहे. अलेक्झांडर त्याचे अधिकारी उशिरात उशिरा म्हणजे जून महिन्यात युध्दभूमीवर अवतरले.

चुकीच्या ठिकाणी उतरलेले अकरा हजार सैनिक व त्यांची जनावरे बारा तास चालून–पोहून पैलतीरावर उतरतात. तोच पुरू पुत्राच्या दोन हजार सैन्याच्या दृष्टीला पडल्यावर ग्रीकांना विश्रांती कुठली ? जनावरांना कडबा कुठला ? व ब्रेकफास्ट तरी कुठला ? त्या सैनिकांना भले लुटायचे नसेल पण पुरूचा पुत्र व भारतीय सैनिक त्यांना भोडेच सोडणार ? पुरूचा मुख्य कॅम्प तिथून दोन मैल दूर होता. म्हणजे युध्दाची खुमखुमी असलेल्या ग्रीक घोडदळाला पुरू सैन्याच्या डाव्या व उजव्या बगलांकडे जायला लढत पाच मैलांचे अंतर कापावे लागणार होते. सैन्याला ते शक्य नाही.

या युध्दासठी अलेक्झांडरला आपले सैन्य स्वतःच्या कॅम्पपासून पुरूच्या छोटया तुकडीपर्यंत पोचायला बारा ते चौदा तास लागले व त्यानंतर दोन तास प्रत्यक्ष युध्द यात अलेक्झांडरचे कमीत कमी सोळा तास गेले व पुढे प्रत्यक्ष पुरूशी आणखी दहा तासांचे युध्द बावीस ते सव्वीस तास, जगामध्ये कुठल्याही देशाच्या सैनिकांनी अशी अविश्रांत खणाखणी करून युध्द जिंकल्याची नोंद नाही.

संध्याकाळपर्यंत युध्द करून वीस हजार हिंदुस्थानी सैनिक स्वतःचे दोनशे ऐंशी सैनिक मारून ग्रीकांनी जिंकले हे खरं मानता येईल का ? ग्रीक सैनिकांना पळावे म्हटले तरी कारी टेकडीने वाव ठेवलेला नाही. पळायचेच झाले तर पुरूने औदार्य दाखवले असेल तरच उरलेसुरले सैनिक घेऊन अलेक्झांडर पळाला म्हणून वाचला ही भौगोलिक वस्तुस्थिती आहे.

ग्रीकांच्या काळ कामाचे संदर्भ जुळत नाहीत. सैन्यच नसेल तर अलेक्झांडर वाटाघाटीला कसा उभा राहीला वा आणखी दोनशे पंचवीस ते अडीचशे मैल बियास म्हणजे पूर्व दिशेला कसा जाऊ शकेल ? त्यामुळे फार तर तो झेलमच्या दक्षिण किनाऱ्याने म्हणजे पुरूच्याच हद्दीतून पळून जाऊ शकला अशा निष्कर्षाला यावे लागते.

जनरल ॲबटचा कारी रणभूमीचा नकाशा, त्याचे युध्दभूमीचे व्यावसायिक अनुभव व भौगोलिक परीक्षणे असं निश्चित दाखवतात की ग्रीकांचे ढालीने एकमेकांना चिकटून एका गटा गटाने भाले आडवे करून पुढे जात रहाणे मैदान सपाट असेल तर शक्य होते. जर मैदान क्वार्टझचे, टेकडयांनी वेढलेले सुमारे तीनशे हत्ती व एका रथात सहा सैनिक असे दोनही बगलांवर चार हजार रथधारी असतील तर थकले– भागलेले सैनिक (ग्रीक) स्वतःहून हल्ला का म्हणून चढवतील. अलेक्झांडरची कुठलीच व्यूहरचना उपयोगी पडली नाही. तलवारीचा उत्कृष्ट उपयोग हिंदुस्थानी करत. त्याचे धनुष्य हे माणासच्या उंचीचे, बाणही तीन फूट लांबीचे; शत्रूचे चिलखत फोडू शकणारे (एरियन), क्वार्टझची रणभूमी ही

जबलपूरच्या भेडा घाटासारखी खडकाळ, माळ मैदानात वसलेली असल्याने हिंदुस्थानींनी आपल्या शस्त्रांचा योग्य उपयोग केला.

ग्रीकांची संख्याच मुळी पाच हजार घोडदळ व सहा हजार पदाती याहून जास्त नसताना फ्लॅन्क फॉर्मेशन बनणार कसे. अडीच मैल डावी व अडीच मैल उजवी बगल ते गाठणार कधी ? हे करण्याएवढा वेळ त्यांच्याजवळ नव्हता. शिवाय हत्तीदल आणि रणधुरंधर पुरू व पन्नास हजार सैन्य. त्याच्याशी लढून ग्रीकांना स्वप्नातही शक्य नव्हते. ॲबटने ग्रीक नकाशा 1848 साली तपासून पाहणी केली नसती तर मैदान क्वार्टझचे आहे. खडकाळ पाच मैल लांब – रूंद पठराचे आहे हेही आम्हाला समजले नसते. ग्रीक सैन्याने अठ्ठावीस सैनिकांच्या बदल्यात वीस हजार हिंदुस्थानींना दहा तासांच्या प्रवासात लढाईत कंठस्नान घालण्यासाठी प्रत्येकी सत्तर ते पंच्याहत्तर सैनिक मारावे लागतील.

हे शक्य झाले असं दाखवण्यासाठी ग्रीक इतिहासकारांनी हत्ती बिथरल्याची खोडसाळ नोंद करून ठेवली आहे.

स्कॉटलंड यार्डचे सहकार्य घेऊन वा स्वतंत्रपणे हिंदुस्थानने संशोधन पुढे चालू ठेवण्यासाठी इस्त्रोचे सहकार्य घेणे वा पाकिस्तानच्या अनुमतीने कारी परिसर ते झेलमचा दक्षिण किनारा ते सिंधचे मकरान बंदर हा सुमारे एक हजार किलोमीटर प्रदेश अनेक सत्य घटनांचा पत्ता लागेल.

अलेक्झांडर द ग्रेट हा सम्राट पदापर्यंत पोचूनही ते पद पेलू न शकलेला सम्राट आहे. तो ॲरिस्टाइल त्याचा गुरू असूनही काही शिकू शकला नाही. भारताशी त्याचा आलेला संबंध फक्त अठरा महिन्यांचा आहे. अलेक्झांडर इथे अंभीच्या निमंत्रणावरून आला नाही वा त्याला पुरूचे पारिपत्य करण्यामध्ये विशेष उत्सुकता नव्हती. त्याला इथल्या ऋतुचक्राची माहिती नव्हती.

अलेक्झांडरचा विचार करताना तक्षशिला नगरीचा विचार करावाच लागतो. कारण इथे त्याचे वास्तव्य फेब्रुवारी 326 इसवी सनपूर्व ते जुलै इसवी सनपूर्व 326 म्हणजे पाच महिने निश्चित झाले. या पाच महिन्यात तो एकदाही तक्षशिला विद्यापीठात गेला नाही वा त्याचा प्राचार्य असलेल्या आर्य चाणक्यची भेट घ्यावी असेही त्याला का वाटले नाही हे अनाकलनीय आहे. आर्य चाणक्यनेही त्याचा कुठे उल्लेख केला नाही हीही तितकीच खटकणारी गोष्ट आहे.

आर्य चाणक्य व चंद्रगुप्त मौर्य हे एकमेकांचे हितचिंतक होते व ते एकाच वेळी किंवा थोडया मागे–पुढे पाटलीपुत्र सोडून पळाले. पाटलीपुत्रातून इतरत्र कुठेही न जाता ते तक्षशिलेकडे का वळले हा विचार घेण्यासारखा प्रश्न आहे. ग्रीक इतिहासकारांना चंद्रगुप्त

मौर्य सादूकोटन शशींगुप्त माहींत होता. परंतु आर्य चाणक्यची काहींही कल्पना नव्हतीं या इतिहासातल्या खटकणाÚया गोष्टीं आहेत.

आलेक्झांडरच्या शौर्याचा जो डंका ते वाजवतात त्या ग्रीक इतिहासकारांना अलेक्झांडरचा भूगोल कच्चा असल्याचीं जाणींव झालीं नाहीं. त्याच्या जन्माआधीं निदान सातशे ते आठशे वर्षांपासून रोम मध्ये आशिया–पेकिंगपर्यंत जाणारा ट्रेड रूट होता परंतु असा काहीं व्यापारमार्ग आहे हेच ठाऊक नव्हते. जे त्याच्या काळातील व्यापाÚयांना ठाऊक होते. तो जगाचीं मर्यादा सिंध प्रांताजवळच्या अरेबियन समुद्राशीं संपते एवढंच जाणून होता. त्याच्या हिशेबीं कधीं काळीं पर्शियन सत्तेचा भाग असलेले सिंध पंजाब काबीज केले कीं तो जगज्जेता होणार अशीं कल्पना करून तो प्रंचड सैन्य व घोडदळासह भारतावर चाल करून आला.

तक्षशिलेत त्याचं व त्याच्या प्रचंड सेनेचे चांगलेच स्वागत झाले, पाच महिने वास्तव्य झाले. युध्दभूमीं फक्त शंभर मैल दूर म्हणजे तो आल्या पुरूवर चालून जाता तर तो पुरूचा पराभव करून पाटलींपुत्रावर सहज चालून गेला असता व जगज्जेता नाहीं तरीं भारताचा सम्राट होऊ शकला असता. तसाच तो तक्षशिलेमार्गे पेकिंगपर्यंत जाऊ शकला असता. पूर्वी उंट,घोडे, बैल, खेचर व व्यापारीं माल घेऊन यवन, इजिप्तींशियन, चींनीं व भारतीरय व्यापारीं मालराचीं अशींच ने–आण करत.

सामान्य व्यापारीं माणसे अशीं पायपींट आपल्या जनावरांसह करत. त्यांचीं साधने, सामुग्रीं, संपत्तीं याला मर्यादा होत्या. नैसर्गिक आपत्तीं चोर लुटारू यांच्याशीं मुकाबला करून ते जे धाडस करत त्यांचा विचार करता अलेक्झांडरने असं खास काय केलंय ? काहीं नाहीं.

विज्ञानाच्या दृष्टींने भारताने अलेक्झांडरने संशोधन करायचे ठरवले तर काय आढळेल याचा उहापोह पुढील प्रकरणांत केला आहे.

1. दिवा स्वप्नांचा जगज्जेता.
2. रणभूमींचे सत्यकथन.
3. इतिहासाला जोड विज्ञानाचीं.
4. इतिहासाचे विज्ञानाधिष्ठित पुनर्लेखन.

– – –